# काव्य तुषार

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४०३



REFBK-0022706
REFBK-0022706

कांतमंडळाचा चौथा प्रातिनिधिक काव्य संग्रह

वाचे बरवे कवित्व कवित्वीरसिकत्व!
ज्ञानेश्वरी

कविमंडळ नासिक प्रणीत
प्रातिनिधिक चौथा कविता संग्रह
"काव्य तुषार"

प्रकाशक-
ग. म. अंधृटकर
ज्ञानवर्धिनी तिवंधा
कविमंडळ नासिक-१

मुद्रक-
श्री. सुधीर पद्माकर रत्नपारखी
सुपर प्रिन्टर्स.
२१७३ मधली होळी नासिक-१

सर्व हक्क -
कविमंडळ नासिक यांचे स्वाधीन

☐ पृष्ठ संख्या-चौरेचाळीस

☐ प्रथमावृत्ती- मे. १९७७

☐ किंमत चार रुपये

२२०
२८०३
३०।१०।८९

# आशीर्वाद

२८०३
३०।१०।८९

नासिक येथील कविमंडळ ही संस्था आता चांगले बाळसे धरू लागली आहे. हे मंडळ 'तुषार' हा स्फूट कवितांचा संग्रह प्रकाशित करून रसिकांच्या दरबारात सादर होत आहे.

त्या संग्रहातील बहुतेक कवि नासिक, मालेगाव, जळगाव, मनमाड आणि मराठवाडा या परिसरातून एकत्र आलेले आहेत.

दुर्दम्य हौस आणि काव्यभक्ति ही त्यांची तळांतील प्रेरणा आहे. प्रत्येक कवि आणि कवियत्री यांना स्वतःचें विश्व आहे, स्वतःची भाषा आहे आणि काहीतरी जाणवलेलें भावलेलें असे अनुभव सांगायचे आहेत.

आज त्यांच्या कवितांचे स्वरुप पहिल्या वहिल्या वर्षाकालच्या 'तुषारा' सारखे असले तरी कधी तरी या कवींची काव्यसरिता दुधडी भरून वाहील अशी या काव्यसंग्राहात जागजागी ग्वाही आहे.

कसकस आणि समृद्ध कावित्वाकडे कविमंडळाची झेप यशस्वी होवो असा मी मनःपूर्वक आशीर्वाद देतो.

REFBK-0022706
REFBK-0022706

— वसंत कानेटकर
नासिक

# एक नम्र निवेदन

कवि मंडळाची स्थापना १५ मार्च १९६५ साली कविश्रेष्ठ कै केशवसुत ह्यांचे जन्मशताब्दि निमित्ताने केली. उद्देश हा की नवोदित कविना असे एक विश्वासाचे कविता वाचनाचे स्थान मिळावे की जेथे ते आपल्या कवितांचे वाचन निःसंकोचपणे करु शकतील आणि इतरांचे ही ऐकू शकतील हा हेतू बऱ्याचशा प्रमाणात सफल झाला हे आतापर्यंतच्या कविमंडळाच्या ४ प्रातिनिधिक काव्य संग्रहातून सुमारे १५० कविच्या कविता प्रकाशित झालेल्या आहेत. त्यात बहुतांशी नवोदित कवि कवियत्री आहेत त्या सर्वांच्या सहकार्याबद्दल आणि ज्ञात अज्ञात हितचिंतकांचे आभार मानावे तेवढे थोडेच

विशेषतः 'काव्य तुषार' हा काव्य संग्रह प्रकाशित करण्यात अनंत अडचणी आल्यात मी तर निरुत्साही झालो होतो पण संपादन मंडळातील श्री. कृष्णनाथ कुळकर्णी श्री. राम गोपाळ पांडे श्री. वसंत वणीकर ह्यांनी मात्र चिकाटी सोडली नाही. प्रकाशनापूर्वी अनेक कंटाळवाण्या प्रक्रिया चिकाटीने केल्या आणि तो रसिकांना सादर केला आहे ह्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार.

सुप्रसिद्ध साहित्यिक व नाटककार माननीय श्री वसंतराव कानेटकर ह्यांनी कविमंडळास शुभ आशीर्वाद दिलेत ह्याबद्दल ह्यांचे ही मनःपूर्वक आभार आहे.

आपला

- ग. म. अंधृटकर

संस्थापक व संचालक कविमंडळ, नासिक.

# हृद गत्

प्रिय रसिका–

तुषारांची किमया तू जाणतोस? जीवनाच्या रुपाने हळुवारपणे श्रांत मनावर फुंकर घालणारे, त्याला उल्हसित करणारे, कोण असतील तर ते जीवन तुषारच!

असेच कांहींसे काव्यरुपाने साकार झालेले अनेक मनाच्या मेघातून वर्षाव करणारे हे तुषार तुझ्या हाती देतांना पहिल्या वहिल्या पावसानें फुलुन येणाऱ्या मोर पिसाचा आनंद आम्हाला होत आहे. कविमंडळानें आतापर्यन्त काफिला, कवितरंग, व काव्य कलश, असे तीन व प्रोत्साहित केलेल्या कविमंडळाच्या सभासदांचे दोन अशा पांच काव्य संग्रहाचा स्वाद तू घेतलास व त्यांना दाद दिलीस, आणि आता त्यानें प्रोत्साहित होऊन हा सहावा काव्य संग्रह तुझे हाती देतांना आम्हाला आनंद होत आहे.

हे तुषार देतांना एक मनस्वी आनंद असा की, प्रिंटींग चार्ज, कागदाचे वाढते भाव, हा सगळा व्यावहारीक खर्च अरबी समुद्रा सारखा झाला असला तरीही उत्साही मनांचे काव्यपक्षी कल्पनेच्या भराऱ्या मारून आमच्याकडे काव्य संग्रहासाठी अनेक कविता पाठवितच होते.

मंडळाचे संस्थापक श्री. ग. म. अंधृटकर यांची जिद्द तळमळ, व चिकाटी, यामुळे ते सेवानिवृत्तीच्या कालातहि आम्हाला लाजवितात व अशा काव्य तुषारांचा वर्षाव तुझ्यावर करतात.

नासिकचे सर्व प्रथितयश व श्रेष्ठकविचे मंडळास नेहमीच शुभ आशीर्वाद आहेत. विशेषत: कविश्रेष्ठ कुसुमाग्रज श्री. योगेश्वर अभ्यंकर, यांचे मार्गदर्शनाचे व शुभेच्छांचें हात मंडळाच्या पाठीशी आहेत, या तुषार वर्षावांना महाराष्ट्राचे ख्यातनाम नाटककार माननीय वसंतराव कानेटकर यांनी आपले मन:पूर्वक आशीर्वाद व शुभेच्छा दिल्या, त्याच्या प्रोत्साहनानें हे सर्व कवि निश्चीतच सकस आणि समृद्ध काव्य पथाकडे वाटचाल करतील, तेव्हा त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.

सुबक छपाई त्वरीतकाम, व आपलेपणा, या गुणांनी श्री. सुधीर प. रत्नपारखी यांनी आमचे मन केंव्हाच जिंकले, त्यांच्या सहकार्याने व श्री. बटावीया यांच्या मुखपृष्ठा वरील सुंदर चित्राने हे तुषार नाचत बागडत साकारले.

अनेक गांवोगांवच्या कवि-कवयत्रींनी आम्हाला आपल्या कविता पाठवून या संग्रहास अधिक शोभा आणली त्यांच्या या आपुलकीच्या भावनेतून तुषार सार्थ झाला त्यांच्या या अमोल सहकार्याबद्दल त्यांचे आभार!

कविमंडळाचा वर्धापन दिन १५ मार्च हा आहे. आणि त्याच वेळी हा काव्य संग्रह प्रकाशीत होणें उचीत होते पण मध्येच लोकसभा निवडणूका जाहिर झाल्या राजकिय दृष्टया विचार करता हे एक वरदान ठरले, पण आमच्या दृष्टीने तो एक मोठा अडथळा ठरला, सर्व प्रेस चालकांनी नकारात्मक भूमिका आम्हाला दर्शविली, त्यानंतर परिक्षा हंगाम आला, लग्न सराई सुरू झाली, तरी आम्ही जिद्द सोडली नाही तो आज साकारतांना मनस्वी आनंद होत आहे.

या आनंदात सर्वस्वी आनंद आता रसिका तुझे आभार मानण्याचा, कारण-यातुषारांचा स्वाद तूं घेणार आहेस, म्हणून हे तुषार तुलाच अर्पण करीत आहोत.

श्री. कृष्णनाथ कुळकर्णी श्री. राम गोपाळ पांडे श्री. वसंत वर्णिकर

संपादन कविमंडळ नासिक.

# शारदे नमीते तव चरणी !

महन् मंगल देवी शारदे
नमीते तव चरणी, माते नमीते तव चरणी ॥धृ॥

विद्येची तर तूं साम्राज्ञी
तेज विलसते तुझेच नयनी
विनय नम्रता विलसे वदनी
नमीचे तव चरणी ॥१॥

सौंदर्याची प्रतिमा तूं गे
मांगल्याची मूर्ती तूं गे
वात्सल्याची पूर्ती तूं गे
नमीते तव चरणी ॥२॥

मयूर वाहिनी तूं श्वेतांगिनी
वीणेची तूं साथ घेवूनी
दिलीस स्फूर्ति उजळूनी
नमीते तव चरणी ॥३॥

सौ. शुभा भालचंद्र देशपांडे
बी. ए. बी. एड्. नासिक

# अनंत

चालत राही मुशाफिरा
चालण्याला या अंत नाही
गती हाच धर्म आपुला
परिश्रमाची तमा नाही !

प्रेमाची करुनी उधळण
दुःखात कुणाला खन्त नाही
नव्यानव्यावर घेई झेप
गतानुगतिक पन्थ नाही !

खळखळ वाहु दे जीवन
जलाशय तुझा संथ नाही
जीवन चक्र फिरव गरगरा
त्याच आसावर अनंत राही !!

प्रभाकर चिंतामण काळे
एम्, ए.
बी. एड. फर्स्ट.
चिंचोला, जळगांव

# आशा - निराशा

आशेचा सागर आहे
म्हणून तुम्ही आम्ही जगतो
आशा रुपी पाणी पिऊन
वाटचाल करितो. !

मी एक वेडा आहे
आशे मागे धावतो
प्रेम रुपी सागरात
उगाचच रमतो. !

आशा निराशाच्या जगी
चालतो असा हा खेळ
आणि म्हणुनच जीवनात आहे
खरा तालमेळ !!

वसंत वणिकर
नासिक.

# चंद्रा !

जीवन एक परिवर्तन, कधी प्रगती कधी अधोगती
कधी सासूचे चार दिवस येतात, तर कधी सुनेचे
हाच अनुभव बा चंद्रा! आला ना तुला?
रामासारखा देव हटला
तुझ्यासाठी.
अनेक प्रणयरागी विसावल्या कुशी
चमकत होता आकाशात,
अवतारी पुरुषाचा बुरखा घेवून
पण चंद्रा!
आजचे दिवस आहेत विज्ञानाचे
सूक्ष्मातून पहाणाऱ्या वैज्ञानिकांचे
आमची प्रगती, तुझी अधोगती हेच सांगत आहे
बा चंद्रा!
जीवन एक परिवर्तन! परिवर्तन!

कु. मीनाक्षी रा. टोकेकर
नंदुरबार

# आस वेड्या मनाची !

वेड्या मनाची आस ही, सुटेल कां कधी तरी?
जीव लावण्या इतका जिव्हाळा, मिळेल कां कुठे तरी?

मधूर सूर छेडण्याची आस ही मनाची
अशी विणा मिळावी ही तळमळ जिवाची
भरुन येईल कां कधी, जखम या मनाची!
सुगंध देईल कां कधी, कस्तुरी कल्पनेंची?

जगण्यासाठी जीवन हे जगतो कसे तरी
स्वच्छंदी यामनाची भरारी ही कुठवरी?
धडपड या पाखराची पिंजऱ्यातून सुटण्याची
स्वप्न नगरी या पिंजऱ्याची होईल कां कधी तरी?

विव्हळत्या हृदयाला देईल ओलावा कुणीतरी
येऊनी प्रेमाची फुंकर घालील कुणी या अंतरी
वाळवंटी फुलविण्या बाग देईल पाणी कुणीतरी
नयनांच्या अश्रुत वाटा, येईल कां कुणी तरी?

अनिरुद्ध समुद्रे
अंबाजोगाई. मराठवाडा

# माघार

वाटते व्हावे सत्याचे पुजारी
घ्यावा असत्याचा बळी
वाटते व्हावा ज्ञानाचा दीप
दाखवावा प्रकाश, साऱ्या जगतास

वाटते यावी अंगी शक्ती भिमाची
घोटावे डोळे खलांचे, या जगतीं
पण - - - - -
न करता काही ही

घेतो मी माघार
पडती कर लुळे
होती गात्रे शिथील
मनी उदासिची काजळी झाकळे !

रमेश ए. पाटील
पिंपळनेर

# भाववेडी

संध्या छायेच्या झाकोळत्या प्रकाशात
मी पाहिली एक भाववेडी

दूरवर एकान्तात काळ्याभोर कातळावर
फेन धवल लाटां मध्ये अलगत पावले सोडून बसलेली
एक श्वेत वस्त्रांकिता
माळला होता धुंद मोगरा आसमंत भारणारा
त्या गूढ रम्य वातावरणात भाव विश्व जपणारा

मंद शीतल वारा स्वप्न आंदोलित होता
स्पर्शणारे थरारक तुषार स्वप्न सृष्टीत वावरत होते
निशेच्या साम्राज्यात चांदण घसरत होत
मुक्त रेशमी कलपावरुन
चंद्राच सौरभ झिरपत होतं झुकल्या पापण्यावरुन

सोबत फक्त निर्भर न संपणारा एकान्त
क्षितीजावर जेंव्हा दिनकरानं घातली उषेस साद
कोवळे किरण बिलगले तिच्या सर्वांगास
नाजुक मोगरा केसावरला गेला होता सुकुन
भावविश्व उधळलं होतं भोवतालच्या लालीम्यातून

कु. एन. ए. लेलें
नासिक

# स्मृती तरंग

कधी मनाच्या जलाशयावर
गत स्मृतींची लाट उसळते
विस्मृतीतल्या त्या आठवणींना
अशी आज कां जाग येतसे!

सुखद् क्षणांच्या आठवणींना
तनमन अवघे व्यापून जाते
धुंद दिसांच्या धुंदी मध्ये
व्यथा आजती विसरुन जाते!

तरळू लागतो नयना समोरी
मंगलदिन तो भाग्याचा
साकारला आहे सुंदर चंद्र
माझ्या मनातील स्वप्नांचा!!

सौ. प्रतिभा अरुण पाठक
नासिक.

# स्मृति

स्वप्न स्मृतिच्या स्वर संदेहावर
अजुनी कां रे प्रिया मी गावे
आठव येता प्रणय धुंदी ती
परि न कां तूं मज मिठीत घ्यावे !

यौवनी जो कलश होता
उत्सुक चुंबाया तूं
आज परि तो रिताचि होता
मीच एकली जोगीया गाता
स्वरांनीच कां रे विरुनी जावे !

आयुष्याची सरता मैफल
सांग कसे ते मिलन होईल
स्मृतीची जी प्रतिमा उत्कट
सांगु कुणा जी हृदया ठावे !

प्रकाश अंघृटकर
आगाशीं विरार

# पडछाया !

आभाळात दाटलेल्या दरिखोऱ्यांच्या पडछाया
एकमेकींशी लपंडाव खेळू लागल्यावर
पाना पानातून चुकली वाट शोधत
सवंगड्याला हाकारु लागल्यावर !

वाटतं सांगाव त्यांना फिरुन फिरुन
नका गडे पुन्हा असा वेडा खेळ खेळू
एकमेकातच लोपलेल्या स्वत्वा मधलं
स्वतःच वेगळेपण वेगळे शोधू !

नका गडे पुन्हा उगाच आर्तशी साद घालू
दोन ध्रुवा मधील दुरत्व नका अस उलगडू
नकागडे पुन्हा कधी वाऱ्यासवे मैत्री करु
चांदण्यांच स्वप्न पापण्यांवर ओलं करु !

राहू द्या त्या छायेला जिथं ती राहते आहे
विचारु नका तिला कसं ती जगते आहे
नक्षत्रांच स्वप्न आभाळात पडलं होतं
दरीखोरं तेंव्हा उगाचच हसलं होतं !!

कु. प्रतिभा प्र. खटावकर
जळगांव

# उचल जरा जपुन पाऊल !

तूं रुप सुंदरी नयनी मनोहर
चुकवुनि नजरांचे तीर
ठेवुनी नजर चौफेर
उचल जरा जपुन पाऊल !

रुप तुझे केवडा, गुलाब गाली फुलला
रोमांकित बहरली ज्वानी, सांभाळ अता तोल
उचल जरा जपुन पाऊल !

तूं अल्लड पोर तारुण्याचा संचार
बेफाम फुललीस सांभाळ चैतन्याचा जोश
लागेल दृष्ट पापी नयनांची, मस्ती तर तारुण्याची
क्षिणुन झिरपुन जाशील
उचल जरा जपुन पाऊल !

जिवनाची तूं कळी, होवुनि जाई फुलं
गळुन पाकळ्या-वृध्दतेची कधि न घें चाहुल
तुझीया रमणी पौरुषत्वाला कधी पडावी भूल
उचल जरा जपुन पाऊल !!

अे. सं. जावळे
नासिक.

# शिकार

पारधी
हरणाच्या शिकारीला
पळू लागला.
हरिण पुढे पुढे

पारधी मागे मागे
हिरवी झाडे
काळी छाया
आशा निराशेचा झिम्मा

बाण सुटतो
हरिण पुढे पळते
एक कोवळी कळी
विधून खाली पडते.

सौ. सुशिला शहा
चोपडा (जळगांव)

# गुलाब कळी !

गुलाब कळी तुज टाकली कुणी खुडुनी
जग हे घातकी मनी घे जाणुनी !!

फिरु नको अशी बिनवाली
जीवनाची तुझ्या दुपार झाली
पाहुनी कळी टाकील कुणी जाळी
स्वैर मनाची तुझी भावना खुळी ॥१॥

झुळूक अवचित येऊनी
टाकील हा सुगंध पसरुनी
येतील भुंगे जातील गोंजारुनी
खेळ क्षणाचा जाईल जीवन कुजुनी ॥२॥

पार कर वाट अवघड यौवनाची
सामोरे होईल बाग स्वर्ग सुखाची
चारित्र्य रत्न हे ठेव सांभाळुनी
व्यर्थ होईल तोल मनाचा जाऊनी ॥३॥

- अनिरुद्ध समुद्रे
अंबाजोगाई मराठवाडा

# माझी कविता !

माझी कविता
छोटी कविता
किती हसते खळाळून !

सुंदर माझा तो लघुनिबंध
तिच्यावर जातो भुलुन
कधी कधी होते ती माझ्या
लघुनिबंधात विलीन
कवितेंचा लघुनिबंध होतो मिलिंद !

खचितचि माझ्या लघुनिबंधाला
कविताच खुलविन जीवन रथाला
पण हाय - - - - -
माझा लघुनिबंधच संपला ! !

- कु. विजयमाला नारायण शुक्ल
नासिक.

# कन्हैयाची बासरी !

कन्हैयाची वाजली बासरी.
गाई रंगल्या गोपी रंगल्या
सगळे सगळे रंगले रे !

आज आनंद आनंद झालारे
गोप गोपी म्हणती बजाव ना बासरी
गाई डोलत म्हणती बन्सरी बजा !

नाही ऐकली कधी अशी गोड बासरी
पण हा आजचा आनंद रे नविनच आनंद
बन्सरी बजा कन्हैया बजाव नारे बासरी! !

– वृन्दा नारायण शुक्ल
नासिक.

# अलंकार साज !

स्वसाहीत्य पताका झळकु दे, माझी मोक्ष मंदिरावरी
ज्ञानलता असु दे, माझी गगनास भेदणारी
मनात माझ्या असु दे, इच्छा ध्येय गाठणारी !

प्रयत्नांच्या समवेत इश्वराला बोलवणारी
शब्दांना असु दे, धारा अमृत गोडव्यापरी
होइल ना प्रभो इच्छा पूर्ती
जरी अज्ञान बालीकेचे चुकले तरी !

हृदयी माझ्या असु दे, सागर प्रेम भावनेचा
तसाच तत्पर हात असु दे, दुसऱ्या साठी मदतीचा
मिळेल ना अलंकार साज मला, हा माझ्या ध्येयपूर्तीचा
घालुन मिरवेल चार चौघात इश्वरी चिंतनाचा !!

– कु. विजयमाला नारायण शुक्ल
नासिक.

# अंतरंग !

अंतरंग तुझे कसे ?
भासे मज मोर पिसे !

अंतरंग तुझे कसे ?
वज्राहूनी जड भासे !

अंतरंग तुझे कसे ?
लोण्याहूनी मऊ असे !

अंतरंग तुझें कसे ?
तुझीया रंगी माझे ठसे !

अंतरंग तुझे कसे ?
माझ्या ठायी कांही नसे !

असे तुझे अंतरंग
माझे हे कोरडे अंग ! !

– पी. सी. गवंडी
शेवगांव अहमदनगर

## रात्र !

रात्र कुशीत आहे–
पण गर्भारलेली
तृप्त पाहणेंच आता
तिला ओटीपोटी–
चांदण्याने तुडुंबलेली !

## अजून !

ओसरल्या लाटा
आटले जल
पण किनारा अजून हिरवा आहे
पानं गळाली
फुलं गळाली
पण घरटं अजून
शाबूत आहे.
पंख मिटलेली झेप कालची
अजून क्षितीजावर
रेंगाळत आहे.

– सदाशीव कळमडुकर
एम. ए.
मनमाड

# येणार तूं म्हणूनी !

येणार तूं म्हणूनी
गुलाल उधळला प्रीतीचा
सुगंध दरवळला स्मृतीचा
रंग भरला स्वप्नांचा
अशी रंगली रंगावली !

फुलवित कळी पुष्पाची
करीत उधळण तेजाची
गात गीतें तव स्मृतीची
कलिका झाली स्वप्न भारली !

किरणे येऊनी आशेची
स्मृती वाटूनी अंतरीची
घेता साथ सुमनांची
फुलबाग प्रितीची फुलली ! !

— चंद्रकांत म. आवटे
जुन्नर (पुणे)

# शिल्प !

युगा युगाचे भान सोडूनी
आकाशाचे गाणे गावे
क्षितीजाचे निबंध मोडूनी
धरतीच्या अन् मिठीत जावे !

ओंकाराच्या आकारातून
बिंब मनाचे जाणूनि घ्यावे
अन् ब्रह्माच्या स्पंदनातून
रुदन सारें पिऊन घ्यावे !

अव्दैत्वाच्या अधरव्दयातून
अभंग भाविक भाव फुलावे
त्या भावातून न्हाऊन निघता
इन्द्रधनुचे रंगच ल्यावे !

मनपिसारा फुलुनि येता
हलके होऊनी उंच उडावे
अन् आकाशी मिळता मिळता
अनंतातले शिल्प घडावे !!

— प्रमोद बा. टेमघरे
ओझर (मीग)

# उभी निरंतर वाट पहात !

निळ्या नभातील लक्ष तारका लख्ख उजळल्या आकाशी
उरी मानसी झुंजत पेटत अंधकार हा दाही दिशी ॥१॥

दीपावलीचे दीप उजळती धवल प्रकाशे ही धरती
नेत्र गुंफिती अश्रुमालिका तिमिर घोर जमता भवती ॥२॥

भोवतालच्या जगात उडती आनंदाची ही कारंजी
तुझ्या स्मृतीविण मनात माझ्या नसे दुजी आतषबाजी ॥३॥

तुझ्या विना जग उदास दुबळे कुठून तृप्ति अंतर्यामी
स्पर्श तुझा होताच एकदा फुलून येईन मी रोमी ॥४॥

धन दौलत ती व्यर्थ तुजपुढे नको सुख तसे काळीज जाळून
मनोकलम हे करपून जाते गर्द पाकळ्या मिटून घेवून ॥५॥

आतुर होऊनि तुझ्या दर्शना ध्यास घेऊनि हृदयात
रचुनि माळ सुंदर स्वप्नांची उभी निरंतर वाट पहात ॥६॥

– टि. स. पाटील
कन्नड (औरंगाबाद)

# आठवण !

आठवणींच्या तृणावर
नाजुक मन असत
दवा सारख त्यावर !

विरहाची पडता किरणे
त्यावर
सुखावतात कशी ती
अकस्मात एकमेकांवर !!

– पंडित बागुल
नासिक

# क्षण !

असुन माहित येणे जाणे
तरी ही जगत असतो
आम्ही कुठल्यातरी आशेनें
दिवसे दिवस होत असतो
चूर मस्तीनें !

बेसावध पणे
असाच येतो
एकादा क्षण
नेतो आम्हाला हिरावून
प्रितीच्या बाहूपाशातून !

उरतात मग मागे
फक्त आमच्या
स्मृती ! स्मृती ! स्मृती !

— अशोक हि. वनमाळी
नासिक

# आता !

मंडपाकडे जायची घाई आहे
आज असा रोखून पाहू नकोस
जुने रेंशीमी वस्त्र फाटत आहे
जवळ पास उभा राहू नकोस !

स्वारी घोड्यावर सजुन येत आहे
उगीच धडकन वाढवू नकोस
प्रेम दिल्या घेतल्याची जखम आहे
तिला आणखी वाहती करु नकोस !

वेदनासह समर्पित होत आहे
बांधली जखम आज सोडू नकोस
सूर तुझे साथ तुझी विरत आहे
अक्षय कुंकवाला अडवू नकोस !

सप्तपदी करायची घाई आहे
तळचा काळती गाणी गाऊ नकोस
आता तोच माझा पतितपावन आहे
हिरव्या काकणाला दृष्ट लावू नकोस !!

– प्रा. शं. क. कापडणीस
सटाणा

# अभंग आपुली प्रीति !

करोत कुणी लाख प्रहार आपुल्या प्रेमावरती
प्रहार तयांचे हवेत विरतील अभंग आपुली प्रीति !

रेशीम धाग्यानें गुंफलेले रेशिम आपुले नाते
ह्या नात्या पुढती झुकेल खड्ग झुकेल वज्रपाते !

पत्थराला फुटेल पान्हा बघुनी आपुली असीम प्रीत
प्रेमी युगुलांची निंदा करणें ही जगताची ग रीत !

असंख्य वादळे उठतील आता, करतील अपुले अहीत
भिऊ नकोस तूं झेलीन सारे ही वावटळी छातीत
जळतील जळोत जळणारे, अग जळणेच त्यांचे ध्येय
आपण गाऊ स्वच्छंदानें प्रीत गीत हे गेय !!

– मदन यशवंते
शायर-ए-आवारा

# विखारी नागिण !

वासनेची विखारी नागिण
केव्हा दंश करिल हे माहित नसते
तिला रात्र समजत नसतें की दिवस दिसत नाही !

ती भक्ष्याची मनःस्थिती ओळखत नाही
तिला फक्त एकच आसूरी समाधान असते की
ही संधी नामी आहे, मी तिचा फायदा कां उठवू नये !

आणि मग ती जाते आपल्या कैफीत
विसरुन सारें तिचे मूळचे मीपण
बनते फक्त वासनेंची मूर्ति
अशा वासनेंची कशी करु मी तृप्ती ! !

– उल्हास रहाणे
नासिक.

# अतृप्त !

क्षितीजाहुनी सावल्या–सरल्या
सरुनी सरुनी
पायी टेकल्या !

टेकुनी टेकुनी
माझी त्याच त्या उंची मोजताय !

मी कसा ?
मी कसा ? एक गरदोळ !

आणि पाठी एकच उत्तर
मी फक्त तीचा गुलाम
गुलाम गुलाम.

– राधानंद आशिवकर
भोसर.

[redacted]

# अबोल सावली !

त्या रखरखत्या वाळवंटात
जीवनाच्या भयाण रस्त्यात
तीच माझ्यासह चालायची
नाचायची तीच माझ्यासह !

पण असे सवत तीची रजनी
मत्सर तीचा काळजा पासुनी
सूर्या समक्ष मला बिलगते
मध्येंच कोठे तरी सोडून जाते
अशी जणू ती अबोल बाहुली
आहे माझीच अबोल सावली ! !

– दत्ता बागुल (बाबा)
संगमेश्वर मालेगांव

# जल विहार !

चला जलविहाराला जाऊ या
आनंदात न्हावू या !

छोटयाशा होडीत डौलदार शिडात
पतवार हाती सांभाळू या !

रात्रीच्या चांदण्यात निळसर जळात
ऊबदार वाऱ्यात तरंगु या !

भयाण वादळात उसळत्या भवऱ्यात
क्रुद्ध निसर्गात, तीर गाठू या !

चला जलविहाराला जाऊ या
आनंदात न्हावू या !!

– रमणलाल सुराणा
एम्. ए. बी. एड्.
नासिक.

# दिया तले अंधेरा !

सही कहते हैं दुनिया वाले
की दियातले अंधेरा

इक मासूमसी सूरत खडी है
सरपर रोशन दान लीए
जुलुस को उजाला देने

जुलुस को उजाला देने वाली
दुआँ मांगती है
खुदा ! हो सके तो मेरें जीवनमें
थोडीसी रोशनी दे दो ! !

ब्रज मोहन शर्मा
मालेगाव.

# नींद !

पहले तुझे पानेकी आरजूने मुझे
सोने नही दिया !

फिर तुझे पानेकी खुशीमे मै
सो न सका

अब तेरी बेवफाई मुझे
सोने नही देती !

काफी राते जाग चुका हूँ
नींद है इतनी रातों की
सोच रहा हू मै अब
सोऊंगा एक दिन ऐसे की !

फिर कभी उठनेका नाम न लुंगा
मगर फिर भी और किसीका नही
सोते वख्त भी नाम बस तेरा लूंगा !!

– धनपत ब. अग्रवाल
नासिक.

# स्वर नि अक्षर !

स्वर नि अक्षर
प्रकटनाची दोन माध्यम
पण केवढी भिन्न !

माणसाचं अंतरंग
वाणी स्वरा वाटे प्रकट करते
तर तेच प्रकटन - - - - -
लेखणी अक्षरांच्या माध्यमातून करत असते !

पण प्रकटनाची ही दोन्ही माध्यमं
भिन्न असली तरी
दोहींचा लय विलय एकाच केंद्र स्थानी असतो !

ॐ स्वरुप ओंकाराच्या
स्वरं नादब्रह्मात ॐ काराचा वेध घेत असतो !
तर अक्षरं
आत्म स्वरुपातच ॐ कार शोधीत असतात !!

– रामगोपाळ पांडे
नान्दुरा (विदर्भ)

# कविता !

जेंव्हा येतो मनाला अुमाळा
तेंव्हा फुटते शब्दाला वाचा
शब्द शब्द जुळत जातो
मग वाटतो शब्दांचा जिव्हाळा.

किती शब्द जुळले तरी
भाव संपता संपत नाही
भाव संपत नाहीं म्हणून
शब्दांनाही सोडवत नाही.

भावशब्दांचा हा खेळ
दोघांचा होतो जेंव्हा मेळ
तेव्हाच खरी कविता होते
मुक्या मनाला सुखवून जाते
मुक्यामनाला सुखवून जाते.

– ग. म. अंधृटकर
कवीदास

# वेदना !

छेडीता सतार
घुमती मंजुळ ध्वनी
पण छेडीता हृदय
वेदनेचे स्वर पडती कानी

डोंब उसळतो वेदनेचा
तारा तुटतात तटातट
बंधनें शितिल होतात
हृदयाचा होतो स्फोट

धगधगते मनाची आग
प्रेमाची आहुती पडते त्यात
डोक्याच्या ठिकऱ्या उडतात
जिवंतपणी मरणाऱ्या वेदना

– आर. डी. भोसले
मालेगांव

# दरिद्री मानवता !

मानवते तुला लक्ष दंडवत
तुझा मानव जळून गेला
लक्ष दिव्याचा सूर्य प्रकाश
काजव्यामुळे विझुन गेला !

मूर्ती भंगली जरी तुझी
पण कां दगड सुद्धा भंगला !
ज्या दगडाला तूं देव केलेस
त्याचा कां जळून कापूर झाला !

दरिद्रता की मानवता !
की मानवी दरिद्रता !
नाही नाही तसे हो नाही
ही तर दरिद्री मानवता !!

– अनिल कुमार
ओझरकर नासिक ३.

# कंठ देरे !

लागलीसे गोडी तुझ्या भजनाची
आणीक आवडी, काय सांगू ?

चंचल हे मन, स्थिर कैसे व्हावे
वेसन तयाशी, कैसे घालू ?

टाळ मृदुंग वीणा, गुण तुझे गाती
गीत माझ्या कंठी, बेसूर कां ?

टाळांच्या संगती मृदुंगाच्या गती
टाळ माझ्या हाती, चुकावा कां ?

तुका एका नामा, तयाचा मी दास
गाण्या वापा गुण, कंठ देरे !!

– मधुकर वा. निकम
दाभाडो

# हमी !

कां कुणाच्या आयुष्याच्या उगाच घटका मोजतो
सर्वांसाठीं खुले दार क्रम तुझापण लागतो !

आता खरें हे जीवन सचोटिनें तरी वाग
आणि मनातून तुझ्या खऱ्या अर्थी विझव आग !

पुण्य किती दाखवितो? . . . अंगी परी सारें पाप
असे अर्धे भंगलेले कोण मोजिल तुझे माप !

भाव कोणता दाखवितो, हमी याची देशील काय
सांभाळणे कठीण आहे जागे वरुन उठतील पाय !!

– पी. सी. गवंडी
शेवगांव (अहमदनगर)

# जीवनाची नदी !

जीवनाची नदी वहात आहे
प्रीतीचा सुवास दरवळत आहे
सुखदुःखाच्या लाटा उसळत आहे
जीवनाची नदी ही वहातच आहे ॥१॥

ढोंगी लोकांचा मिजास वाढत आहे
जीवन मृत्युचे धबधबे कोसळत आहे
जीवनाची नदी ही वहातच आहे ॥२॥

या नदीत फुलांबरोबर निर्माल्यही वहात आहे
तसेच चरांबरोबर अचरही वहात आहे
जीवनाची नदी ही वहातच आहे ॥३॥

– कु. वीणा नारायण शुक्ल
नासिक

# देव नाही ना एकच !

दोस्तानी विचारले मला, तुझा आवडता रंग कोणता !
मी उत्तरलो 'गुलाबी' मी तेच विचारले त्याला !

तो उत्तरला 'निळा' त्याच्याच भावाने उत्तर दिले 'हिरवा'
बनविला असता जर एकच रंग ईश्वराने

सर्वांना आवडला असता तो एकच रंग
घेतले अनेक रुप देवाने, म्हणून सर्वांचे देव वेगवेगळे

जर असता देव एकच, तर असता धर्मग्रंथ एकच
तर असता रंग एकच, तर असते सर्व, सर्वांसाठी एकच

पण-तसे नाही
कारण ! - - - - - - - - - देव नाही ना एकच !

– किशोर बाटविया
नासिक-३.

२२६०६
2803

# तुझे ओघळणारे शब्द !

तुझे ओघळणारे शब्द
आज असे अचानक एकाएकी
कां गोठलेत –
राजापूरची गंगा गुडूप व्हावी असे.

शब्दकर्त्यालाही अव्हेरुन –
तूं मला होकाराचा शब्द दिलास.

जीवनाचा धर्म वाहणें आहे
म्हणून सांगतो –

तुझ्या शब्दांना आता
ओघळायला हवं
ओघळायलाच हवं !

– कृष्णनाथ कुळकर्णी
नासिक.

REFBK-0022706
REFBK-0022706

**हे राजानस्त्यजन सुकवि प्रेम बंधे विरोधं**
**शुद्धाकिर्तीः स्फुरति भवना नूनमेतत्प्रसादान!**
**तुष्टैर्बद्धं तदलघु रघुस्वामिनः**
**सच्चारित्र रुष्टैर्नीतस्त्रिभुवनजयी हास्यमार्गं दशास्यः! !**

हे शासन कर्त्यांनो !
प्रतिभाशाली कविच्या प्रेमसंबंधाला
प्रेमदर्शनाला विरोध करणे
सोडून द्या !
तुमच्या विमल कीर्तिचे तेज पसरतें
तें खरोखरच त्यांच्या कृपेचें फळ
संतुष्ट कवीनें रघुराज रामचंद्राचें
महान चरित्र लिहून टेंवले.
त्यांचाच रूसवा झाला तेंव्हा
त्रिभुवन जिंकणारा दहा तोंडाचा
रावणहि केवळ हास्यास्पद झाला.